महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय ( उच्चशिक्षण ) महाराष्ट्र राज्य
४१२, ई-बहिरट पाटील चौक, ओम सुपर मार्केट जवळ, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे-४११ ०१६
WWW:- dhepune.gov.in E-Mail :- budget.dhepune@nic.in

क्र- पीएलए./अं.प.मान्यता/शा.वि.ज्ञा.वि.सं.अमरावती/२०२६-२७/लेखा-३/ E-२७५३१९२ दि- २.४ २०२६

प्रति,

संचालक ,
शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था,
अमरावती.

**विषय- शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती यांच्या स्वीय प्रपंजी खात्यातील (PLA) सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबत.**

**सदर्भ-** १. शासन निर्णय क्र-पीएलए-२०१५/प्र.क्र.१६८/२०१५/तांशि-३/ दि-०१ /०१/२०१८
२. संचालनालयाचे पत्र क्र-उशिसं/पीएलए/अंदाजपत्रक मान्यता/२०२७/लेखा-३/ई-२६९७१३५ /दि.११.३.२०२६
३. प्राचार्य, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती यांचे पत्र क्र-शाविज्ञाविसं/आस्था-३/पीएलए/अंदाजपत्रक/२०२५-२६/४५५/दि. १७.३.२०२६

वरील विषयानुसार कळविण्यात येते की, शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र-पीएलए-२०१५/प्र.क्र.१६८/२०१५/तांशि-३/ दि-०१ /०१/२०१८ अन्वये ३१ मार्च अखेर स्वीय प्रपंजी खात्यामध्ये शिल्लक असणा-या एकूण रकमेच्या ३० % हस्तांतरणीय रकमेचे स्वीय प्रपंजी अदांजपत्रक मान्य/मंजूर करणे आवश्यक आहे, त्या शिवाय संबंधित संस्थेला पुढील आर्थिक वर्षात स्वीय प्रपंजी रकमेतून खर्च करता येणार नाही, असे स्पष्ट निर्देश संदर्भ क्र-१ च्या शासन निर्णयानुसार देण्यात आले आहेत.

त्याप्रमाणे सर्व शासकीय संस्था/महाविद्यालये/वसतीगृहे यांना संचालनालयाच्या संदर्भ क्र.२ अन्वये सन २०२६-२७ करीताचे स्वीय प्रपंजी खात्याचे अदांजपत्रक सादर करण्यास कळविण्यात आले आहे.

त्यानुसार शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती यांनी प्रस्तावित केल्याप्रमाणे शासन निर्णय दि.०१.०१.२०१८ नुसार स्वीय प्रपंजी खात्यामध्ये दि.३१. मार्च, २०२६ अखेरची एकूण शिल्लक रक्कम रु.१,९२,५१,२६५ /- ( रु. एक कोटी ब्यान्नव लक्ष, एक्कावन्न हजार, दोनशे पासष्ट फक्त) आहे.

त्यापैकी ३० % प्रमाणे हस्तांतरणीय रक्कम रु. ५७,७५,०००/- ( सत्तावन्न लक्ष, पंच्याहत्तर हजार फक्त) इतक्या रकमेचे स्वीय प्रपजी खात्याचे अंदाजपत्रक सादर केले आहे.

**तथापी सन २०२६-२७ मध्ये सदरच्या संस्थेचे नॅक मूल्यांकन प्रस्तावित असल्यामुळे रु.१,९२,५१,२६५/- या हस्तांतरणीय रकमेच्या ४० % म्हणजेच ७७,००,०००/- ( रु. सत्याहत्तर लक्ष फक्त) इतक्या रकमेचे स्वीय प्रपंजी खात्याचे अंदाजपत्रक मंजूर करणचे विंनती केली आहे.**

शासन निर्णय दिनांक-१.१.२०१८ च्या मुददा क्र-८ नुसार विशेष परिस्थितीत ४० % पर्यतचे अंदाजपत्रक विभागीय सहसंचालक यांच्या मान्यतेच्या अधीन राहून मंजूर करण्याचे अधिकार संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान करण्यात आले आहेत.

करीता शासन निर्णय क्र-पीएलए-२०१५/प्र.क्र.१६८/२०१५/तांशि-३/ दि-०१ /०१/२०१८ अन्वये प्रदान केलेल्या अधिकारानुसार रक्कम रु.७७,००,०००/- ( रु. सत्याहत्तर लक्ष फक्त) इतक्या रकमेस सन **२०२६-२७** चे स्वीय प्रपंजी खात्याचे अदांजपत्रक म्हणून खालील अटींच्या/ शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे..

१. सोबत मंजूर अंदाजपत्रकातील हस्तांतरणीय बाबीवरच खर्च करण्यात यावा.

२. शासननिर्णयदिनांक- १.१.२०१८ अन्वये आवश्यक तेथे सक्षम प्राधीका-याची प्रशासकीय मंजूरी/ मान्यता घेण्यात यावी.

३.आवश्यकतेनुसार बांधकाम विभागाची तांत्रिक मंजूरी घेण्यात यावी.

४. खरेदीसाठी दि.०१.०१.२०१६ व २४.८.२०१७ मधील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

५. प्रस्तावित केलेल्या बाबीवरच खर्च करण्यात यावी

Digitally signed by
SHAILENDRA KAMLAKAR DEOLANKAR
Date: 06-04-2026 17:46:20

**( डॉ. शैलेद्र देवळाणकर )**
प्र. शिक्षण संचालक,( उच्चशिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ०१६

प्रत. विभागीय सहसंचालक, उच्चशिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांना माहितीस्तव .